




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








। महाराष्ट्र – बीड । सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ । वर्ष ६ वे । अंक १८९ । पाने ४ । किंमत ३ रूपये । मो. : ९८२२१५२९५५ । पान १ ।

https://www.marathwadapatra.in/ । RNI/MAHMAR/2021/80074 । Post:RegNo.L/226/RNP/Renewal/2025-27 । E-mail:dailymarathwadapatra2021@gmail.com











# राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या पत्रातून दुष्काळग्रस्तांसाठी तब्बल १७ मागण्या करण्यात आल्या आहेत.

शेती आणि शेती व्यवसायासाठी घेतलेल्या सहकारी, राष्ट्रीयीकृत बँका, अर्बन बँका तसेच पतसंस्थांच्या कर्जमाफीची मागणी पत्रातून करण्यात आली आहे. तसेच जमीन महसूल आणि कृषी वीजबिल माफ करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त कुटुंबांना प्रतिकुटुंब २५ किलो मोफत धान्य देण्यासोबतच थेट आर्थिक




मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १ लाख रुपये, तर शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी तहसीलदारांना टँकर मंजुरीचे अधिकार देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागात रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करावीत आणि जलसंधारणासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, असेही पत्रात म्हटले आहे. दुष्काळाचा फटका विद्यार्थ्यांनाही बसत असल्याने शैक्षणिक फी, वसतिगृह फी आणि मेस फी माफ करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर फळबागा आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई तातडीने देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे, अशीही मागणी शरद पवार यांनी केली आहे. दसरा आणि दिवाळीपूर्वी शेतकरी व शेतमजुरांना मदत मिळावी, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी विनंती शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## थोडक्यात...

◆ एल निनोच्या परिणामाची दाहकता अजून वाढेल, फेब्रुवारीत तो तीव्र असेल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं वक्तव्य तर ट्रिगर–३ मध्ये गरजेनुसार उरलेले ५ ते १० तालुकेही समाविष्ट करु, मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

◆ दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी मांडल्या आदित्य ठाकरेंसमोर व्यथा, कर्जमाफी जाहीर झाली पण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलीच नाही, दुष्काळाचा जीआर निघाला प्रत्यक्ष मदत कधी, आदित्य ठाकरेंचा सरकारला सवाल

◆ शेतकऱ्यांच्या मदतीच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य, परवानगीशिवाय रजेवर जाणाऱ्यांवर थेट कारवाईचा बडगा; नागपूर जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकारी–कर्मचाऱ्यांना सक्त निर्देश

◆ डोळ्यादेखत डाळिंबाचं उभं पीक करपलं, शेत कोरडंठाक पडलं, सांगोल्यात दुष्काळाचे भीषण वास्तव, आता जगायचं कसं ? सोलापुरातील सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचा सवाल

◆ निवडणूक आयोगातील संशयकल्लोळावर सर्व भाजपशासित मुख्यमंत्री मैदानात, हातात संविधान आणि डोक्यात डावी मानसिकता, निवडणूक आयोगावरील आरोपांवर मुख्यमंत्री फडणवीसांचा राहुल गांधीवर हल्लाबोल, मतचोरी नाही तर विरोधकांचा मेंदूच चोरीला गेल्याचा घणाघात

◆ एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटीप्रकरणी धक्कादायक खुलासा, नुकतेच अटक करण्यात आलेले दोन्ही उमेदवार परीक्षेत टॉपर, आतापर्यंत ११ आरोपींना अटक

◆ जंगलातला नक्षलवाद संपला तरी राज्याच्या शहरी भागात छुप्या पद्धतीने कार्यरत, मुंबईसह राज्यातील शाळा आणि महाविद्यालयातून नक्षलवादी चळवळींचं जाळं, आत्मसर्पित नक्षली कमांडर अनिल रामास्वामी मेकला याचा स्फोटक कबूलनामा

◆ धर्म असू दे, सण असू दे, हा घरापुरताच मर्यादित ठेवला पाहिजे, डीजेविरोधातील लढ्यात अभिनेता सुमित राघवनचे पुण्यात परखड वक्तव्य, विद्यानंद बापटांना दिला पाठिंबा

◆ पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ भाजपकडेच राहणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरवतील तोच उमेदवार, मंत्री चंद्रकांत पाटील यांचं मोठं वक्तव्य

◆ मुंबईतील राम मंदिर परिसरात रासायनिक वासामुळे दोघांचा गुदमरून मृत्यू, सार्वजनिक शौचालयाशेजारील कारखान्यातून वायूगळती, कारखाना मालकाला अटक

◆ वेल्डिंगदरम्यान भीषण स्फोट, उपचारादरम्यान आणखी दोघांचा दुर्दैवी अंत; मृतांचा आकडा पोहचला चारवर; यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड हादरल

◆ नऊ लाखांच्या कर्जापायी खासगी सावकाराला २६ लाख दिले, तरीही अजून २५ लाखांची मागणी, सावकाराच्या छळाला कंटाळून कोल्हापुरातील व्यक्तीने विष पिऊन जीवन संपवल

◆ 'बिग बॉस' फेम दिव्या शिंदेला अटक! ५ लाखांची खंडणी, ज्येष्ठ डॉक्टरांच्या घरात घुसून मारहाण, नेमकं घडलंय काय ?

◆ छटपूजा, दिवाळीसाठी मुंबई–पुण्यातून यूपी–बिहारसह विविध ठिकाणी ४१८ विशेष रेल्वे गाड्या, गोरखपूरला ६४ फेऱ्या

# धनंजय मुंडेंनी केली परळी - अंबाजोगाई तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतीपिकांची पाहणी

## तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत दिली जावी, यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार : धनंजय मुंडे



**●पीएम किसान व प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे किमान दोन दोन हफ्ते एकत्रित तातडीने दिले जावेत, यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटणार**

**●अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथील आत्महत्या केलेल्या कोळगिरे या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे मुंडेंनी केले सांत्वन, एक लाखांची तातडीची आर्थिक मदत**

**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये नुकताच दुष्काळ जाहीर केला असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी विधानसभा मतदारसंघातील परळी व अंबाजोगाई तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देऊन विविध शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करत स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.

अंबाजोगाई तालुक्यातील राडी परिसरात तसेच परळी तालुक्यातील वाघबेट परिसरात मुंडेंनी सोयाबीन सह विविध पिकांच्या नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी स्थानिक शेतकरी व पदाधिकारी आदी उपस्थित होते. खरीपातील संपूर्ण पीक हातातून गेले असून, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान खूप मोठे आहे. कोरडा दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच शासनाने तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून राज्य सरकारकडे मदतीचा अहवाल पाठवावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळावी यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

# रायगडच्या गर्भवती महिलेला बीडमध्ये मारहाण धुळ्यात जिवंत जाळलं !




**धुळे । प्रतिनिधी**

कला केंद्रातील अंतर्गत वादातून रायगड येथील एका ३१ वर्षीय गर्भवती महिलेची निर्घृण हत्या करण्यात आल्याची अत्यंत थरारक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. धुळे तालुक्यातील गरताडबारी परिसरात हा भयानक प्रकार घडला होता. मोहाडी पोलिसांनी अत्यंत वेगाने आणि कौशल्याने अवघ्या तीन दिवसांत या गुन्ह्याची उकल करत चार जणांना अटक केली आहे, तर दोघे जण अद्याप फरार आहेत. पिंकी हनुमंत काटकर (३१, रा. रायगड) असे मृतक गर्भवती महिलेचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत पिंकी काटकर आणि संशयित आरोपी कला केंद्रात एकत्र काम करत होते. यादरम्यान त्यांच्यात अंतर्गत वाद निर्माण ▶▶ उर्वरित पान २ वर

# फळबागा वाया जाऊ देणार नाही

**●केंद्र आणि राज्य शासनाकडून आर्थिक उपयोजना करण्यासाठी अथक परिश्रम घेणार: आ.सुरेश धस, ●शास्त्रोक्त पद्धतीने फळबाग लागवड करा:डॉ.गणेश मंडलिक**

**आष्टी । प्रतिनिधी**

यापूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये सन २०१२ –२०१४ या कालावधीमध्ये राज्यमंत्री असताना नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड यांचे मार्फतीने विविध आकाराचे शेततळे निर्माण केले त्याच धर्तीवर आता फळबाग असो वा नसो शेतकऱ्यांनी मागणी केल्यानंतर शेततळे मंजूर करावे आष्टी तालुक्यामध्ये ९२१० पाटोदा तालुक्यामध्ये ७३५ आणि शिरूर कासार तालुक्यामध्ये ८११ फळबाग



धारक शेतकरी असून या दुष्काळी परिस्थितीमध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

# २८ दिवसांची कटकट संपली! आता 30 दिवस चालणार मोबाईल रिचार्ज; कॉलिंगसाठीही स्वस्त प्लॅन

**मुंबई । प्रतिनिधी**

मोबाईल वापरणाऱ्या कोट्यवधी प्रीपेड ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. मोबाईल रिचार्जशी संबंधित नियमांमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. केंद्र सरकार आणि भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण म्हणजेच TRAI कडून 'टेलीकॉम कन्झ्युमर प्रोटेक्शन १३वा सुधारणा नियम, २०२६' जारी करण्यात आले आहेत. या नव्या नियमांचा उद्देश मोबाईल कंपन्यांकडून दिल्या




जाणाऱ्या रिचार्ज योजनांमध्ये अधिक पारदर्शकता आणणे, ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार पर्याय उपलब्ध ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'कल्पतरु'च्या उपक्रमामुळे बीडमधील गणेश मंडळांना बळ : पंकजाताई मुंडे

**'कल्पतरु प्रतिष्ठान'च्या उत्कृष्ट देखावा स्पर्धेतील विजेत्यांना मुंडे भगिनींच्या हस्ते बक्षीस वितरण**

**बीड । प्रतिनिधी**

गणेशोत्सवातील उत्कृष्ट देखाव्यांच्या माध्यमातून समाजाला दिशा देणारा प्रबोधनात्मक संदेश दिला जातो. अशा स्पर्धांमुळे स्थानिक कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळून गणेश मंडळांना नवी ऊर्जा व प्रोत्साहन मिळते. 'कल्पतरु प्रतिष्ठान'च्या अशा अभिनव उपक्रमांमुळे बीडमधील गणेश मंडळांना मोठे बळ मिळाले, असे प्रतिपादन राज्याच्या



पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत 'कल्पतरु प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून गणेशोत्सवानिमित्त आयोजित इनोव्हेशन चॅलेंज-उत्कृष्ट देखावा स्पर्धेला उत्स्फूर्त

**●बीडचे देखावे पाहण्यासाठी संपूर्ण राज्यातून लोक यावेत : डॉ. प्रितमताई मुंडे**

**गेल्या १०–१२ वर्षांच्या अनुभवातून मला जाणीव आहे की, वर्गणी जमा करण्यापासून ते भव्य देखावा उभारण्यापर्यंत मंडळांचे कार्यकर्ते अहोरात्र कष्ट घेतात. आपले मंडळ इतरांपेक्षा दर्जेदार कसे ठरेल, हाच त्यांचा ध्यास असतो. या कष्टाला दाद देण्यासाठी 'कल्पतरु'सारखे व्यासपीठ अत्यंत गरजेचे आहे. बीडमधील देखावे इतके भव्य व सामाजिक संदेश देणारे व्हावेत की ते पाहण्यासाठी अवघ्या महाराष्ट्रातून लोकांनी बीडमध्ये यावे, अशा सदिच्छा माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केल्या.**

प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा बीडमध्ये रविवारी (दि.२७) सौ. के.एस.के. महाविद्यालयातील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर क्रीडा संकुल व सांस्कृतिक सभागृहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ना.पंकजाताई मुंडे बोलत होत्या. व्यासपीठावर माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ▶▶ उर्वरित पान २ वर

## ◆ संपादकीय...

# माहितीचा अधिकार : लोकशाहीची पारदर्शक खिडकी

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर शासनाच्या कारभाराविषयी जाणून घेण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करण्याचा नागरिकांचा अधिकारही होय. शासनाच्या निर्णयांची माहिती नागरिकांपासून दूर राहिली, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पारदर्शकता राहिली नाही आणि प्रशासनाच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारण्याची संधी मर्यादित झाली, तर लोकशाहीची प्रक्रिया केवळ औपचारिक ठरू शकते. म्हणूनच लोकशाहीमध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांना केवळ कागदपत्रे देणे नव्हे, तर सार्वजनिक जीवनात अधिक अर्थपूर्ण सहभागाची संधी देणे होय. याच व्यापक संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणारा २८ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून जगभर पाळला जातो. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेने म्हणजेच युनेस्कोने माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २८ सप्टेंबर हा दिवस निश्चित केला. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि प्रभावी प्रवेश हा शाश्वत विकास, लोकशाही सहभाग, सामाजिक समावेशन आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे या दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित केले जाते. माहिती ही आजच्या ज्ञानाधारित समाजातील मूलभूत सामाजिक संपत्ती बनली आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक धोरणे अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात योग्य वेळी मिळणारी अचूक माहिती व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर परिणाम करते. भारताच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' हा भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील महत्त्वाचा कायदा मानला जातो. या कायद्याचा मुख्य उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत नागरिकांना प्रवेश उपलब्ध करून देणे आणि शासनव्यवस्थेत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे हा आहे. सार्वजनिक कामकाजात पारदर्शकता वाढल्यास नागरिकांना शासनाच्या निर्णयांची प्रक्रिया समजून घेणे, सार्वजनिक निधीचा वापर तपासणे आणि प्रशासनाकडून अपेक्षित उत्तर मागणे अधिक सुलभ होते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा प्रशासनावरील अविश्वासाचे प्रतीक नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची संस्थात्मक व्यवस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे.माहितीचा अधिकार नागरिकाला शासनाच्या दैनंदिन कामकाजाशी जोडतो. एखाद्या गावात रस्ता बांधण्यासाठी निधी मंजूर झाला असेल, पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली असेल, शासकीय इमारतीचे बांधकाम झाले असेल किंवा एखाद्या कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी सुरू असेल, तर त्या कामाशी संबंधित उपलब्ध अधिकृत नोंदींबाबत नागरिक माहिती मागू शकतो. मंजुरीचे आदेश, खर्चाशी संबंधित नोंदी, कामाची प्रगती, उपलब्ध अहवाल किंवा कायद्याच्या चौकटीत येणारी इतर माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक उत्तरदायित्वाचा आधार बनू शकते. अशा प्रक्रियेमुळे 'शासन काय करते?' हा प्रश्न केवळ चर्चेचा विषय न राहता अधिकृत नोंदींच्या आधारे तपासता येण्याजोगा ठरतो. या कायद्याचे महत्त्व विशेषतः ग्रामीण भारताच्या संदर्भात अधोरेखित होते. गावातील नागरिकांना पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, घरकुल, सामाजिक सुरक्षा आणि विविध शासकीय योजनांशी संबंधित अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. एखादी योजना कागदावर उपलब्ध असली, तरी तिची माहिती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही तर त्या योजनेचा अपेक्षित सामाजिक परिणाम मर्यादित राहू शकतो. त्यामुळे शासनाच्या योजना आणि नागरिक यांच्यामधील माहितीची दरी कमी करणे आवश्यक आहे. स्थानिक भाषेत, सोप्या स्वरूपात आणि सहज उपलब्ध माध्यमातून माहिती देणे हे प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचे महत्त्वाचे लक्षण ठरते. माहितीचा अधिकार सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि शिक्षित व्यक्तींना कार्यालयीन प्रक्रिया समजून घेणे तुलनेने सोपे असते; परंतु ग्रामीण, आदिवासी, वंचित, महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसमोर माहितीपर्यंत पोहोचण्याची अतिरिक्त आव्हाने असू शकतात. माहितीचा अधिकार या नागरिकांना आपल्या हक्कांबाबत प्रश्न विचारण्यासाठी कायदेशीर चौकट उपलब्ध करून देतो. मात्र कायदा अस्तित्वात असणे पुरेसे नाही. माहितीचा अधिकार प्रभावी होण्यासाठी नागरिकांना या कायद्याची जाणीव, अर्ज करण्याची प्रक्रिया, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती आणि अपीलच्या तरतुदी याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. – डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## धनंजय मुंडेंनी....

आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे तसेच याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे धनंजय मुंडे यावेळी शेतकऱ्यांशी बोलताना म्हणाले. राज्य सरकारकडून पीक नुकसानीचे अहवाल सादर झाल्यानंतर आर्थिक मदत केली जाईलच, त्याबरोबरच विमाधारक शेतकऱ्यांना पिक विमा ही मिळेल, तसेच दुष्काळाच्या इतर सवलतीही मिळतील. मात्र खचून गेलेला शेतकरी उभा राहताना त्याला तातडीचा आर्थिक हातभार लाभावा यासाठी केंद्र सरकारच्या पीएम किसान योजना व राज्य सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून कमीत कमी दोन दोन हप्ते तातडीने एकत्रितपणे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावेत याबाबतही मुख्यमंत्र्यांच्या भेटीमध्ये आपण चर्चा करणार असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी एक महिन्यापूर्वी राज्यात सर्वप्रथम बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून विविध सवलती देण्याचे व शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी केली होती. त्यानंतर विशेष आर्थिक मदत तसेच विविध योजनांमधून अर्थसहाय्य करण्याबाबतही आपण पुढाकार घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी आज शेतकऱ्यांशी बोलताना स्पष्ट केले.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांची भेट: दुष्काळामुळे संपूर्ण पीक हातातून गेल्याच्या विवंचनेतून राडी येथील शेतकरी सतीश कोळगिरे यांनी आत्महत्या केली होती, आज राडी येथे धनंजय मुंडे यांनी कोळगिरे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी परिवाराची विचारपूस करत नाथ प्रतिष्ठान मार्फत एक लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत केली तसेच कोळगिरे कुटुंबाला स्वतःचे घर नसल्याने घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ इत्यादी माध्यमातून आणखी ५ लाख रुपये आर्थिक मदतीची व्यवस्था करून दिली. यावेळी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## रायगडच्या गर्भवती....

झाला होता. या वादाच्या रागातून बीड येथे संबंधित गर्भवती महिलेला आरोपींनी बेदम मारहाण केली, ज्यामुळे ती बेशुद्ध पडली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपींनी तिला वाहनात टाकून राजस्थानच्या दिशेने पोबारा केला. प्रवासादरम्यान धुळे जवळील गरताडबारी शिवारात आल्यावर आरोपींनी या बेशुद्ध गर्भवती महिलेवर पेट्रोल ओतून तिला जिवंत जाळून मारले. या क्रूर कृत्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. घटना घडल्यानंतर मोहाडी पोलीस ठाण्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत वेगाने सूत्रे हलवली. पोलिसांनी महामार्गावरील विविध सीसीटीव्ही फुटेजची सलग ११ तास कसून तपासणी केली. या तांत्रिक तपासादरम्यान एका संशयित ह्युंदाई मोबिलो (क्र. MH43/-R4070) वाहनावर पोलिसांचे लक्ष केंद्रित झाले. याच वाहनाच्या आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी धाराशिव आणि अहिल्यानगर येथे धडक कारवाई करत कला केंद्रात काम करणाऱ्या दोन महिलांसह चौघांना बेड्या ठोकल्या. मोहाडी पोलिसांनी या गुन्ह्यात चार जणांना अटक केली असून त्यात दोन महिलांचाही समावेश आहे. सर्फराज ऊर्फ शफिक अलीम मोमिन (३८, रा. धाराशिव), आरिफ ऊर्फ खुज्या आसिफ शेख (३१, रा. धाराशिव), स्वाती ऊर्फ आरती गणेश कुऱ्हाडे (२८, रा. अहिल्यानगर), लक्ष्मी बालाजी पवार (३०, रा. धाराशिव) तसेच या गुन्ह्यातील फारुख शेख (रा. धाराशिव) आणि रोहिणी जाधव (रा. छत्रपती संभाजीनगर) हे दोघे आरोपी अद्याप फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

## फळबागा वाया....

फळबागा वाचवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे परंतु शेतकऱ्यांनी घाबरू नये कोणत्याही परिस्थितीत तुमच्या फळबागा वाया जाऊ देणार नाही असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी येथील दुष्काळी परिस्थिती फळबागा वाचवण्यासाठी उपाय योजना या विषयावर आयोजित कार्यशाळेमध्ये ते बोलत होते यावेळी मुख्य मार्गदर्शक डॉक्टर गणेश मंडलिक बद्रीनाथ जगताप परमेश्वर शेळके विष्णुपंत चव्हाण पाटोदा पंचायत समिती माजी सभापती केशव रसाळ आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे तसेच पाटोदा आणि शिरूर तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शेतकऱ्यां विषयी अत्यंत संवेदनशील नेतृत्व असून त्यांचेवर कितीही खालच्या पातळीवर टीका केली तरी त्यांनी दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांबाबत तात्काळ निर्णय जाहीर केले आहेत दिवाळीपूर्वी हेक्टरी ११,५००/– रु.अनुदान मिळणार असल्याचे जाहीर केले आहे

आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार तालुका कृषी अधिकाऱ्यांनी फक्त कागदोपत्री असलेल्या केवळ अनुदानासाठी असलेल्या फळबागा बंद कराव्यात आणि खरे शेतकऱ्यांना न्याय द्यावा असे सांगून ते पुढे म्हणाले की शेतकऱ्यांच्या फळबागासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त करून घेऊच वेळप्रसंगी केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांचेकडे निवडक २०० शेतकऱ्यांना विमानाने घेऊन जाण्याची आपली तयारी आहे. उपाययोजना झाल्या नाहीत शेतकऱ्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने फळबाग लागवड केली पाहिजे त्यामध्ये माती परीक्षण आणि फळबाग लागवडीसाठी जमिनीची निवड त्या पद्धतीने करावी रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खते जास्त वापरावीत मार्च एप्रिल या महिन्यातच खड्डे तयार करावेत पाऊस पडल्यानंतर शासकीय मान्यता प्राप्त दर्जेदार रोपवाटिकेतूनच रोपे खरेदी करावीत साधारणतः १५० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच फळबाग लागवड करावी यावर्षी दुष्काळी परिस्थिती राहणार असून तापमान वाढणार असल्यामुळे उष्ण वारे वाहणार असून झाडे जगवणे एवढेच आव्हान आपणास समोर असणार आहे त्यामुळे उपलब्ध आहे ते पाणी अति सूक्ष्म सिंचन पद्धतीने प्लॅस्टिकच्या बाटल्या जमिनीमध्ये पुरून केवळ मुळापर्यंत पाणी मिळेल अशी यंत्रणा राबवावी याबाबतचे प्रात्यक्षिक त्यांनी उपस्थित फळबाग धारक शेतकऱ्यांसाठी दाखवले अधिकच्या मार्गदर्शनासाठी त्यांनी त्यांचा मोबाईल क्र.९४२०८१८५६२ यावर संपर्क करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन गणेश शिंदे माऊली जरांगे सचिन रानडे अजित मुळे यांनी केले.

## २८ दिवसांची....

करून देणे आणि रिचार्ज अधिक किफायतशीर करण्यासंबंधित तरतुदी करण्यात आल्या आहेत. २८ दिवसांऐवजी आता ३० दिवसांची वैधता– गेल्या काही काळापासून अनेक टेलीकॉम कंपन्यांकडून २८ दिवसांच्या वैधतेचे रिचार्ज प्लॅन दिले जात होते. त्यामुळे ग्राहकांना वर्षभरात १२ ऐवजी १३ वेळा रिचार्ज करावा लागत होता. ३६५ दिवसांच्या वर्षात २८ दिवसांच्या सायकलमुळे ग्राहकांवर अतिरिक्त रिचार्जचा आर्थिक भार पडत होता. नव्या नियमांनुसार आता टेलीकॉम कंपन्यांना पूर्ण ३० दिवसांची स्पष्ट वैधता असलेले रिचार्ज प्लॅन उपलब्ध करून देणे अनिवार्य करण्यात आले आहे.

फक्त कॉलिंग आणि SMSसाठीही स्वतंत्र प्लॅन– नव्या नियमांमधील आणखी एक महत्त्वाची तरतूद म्हणजे केवळ व्हॉइस कॉल आणि SMS वापरणाऱ्या ग्राहकांसाठी स्वतंत्र रिचार्ज प्लॅन उपलब्ध करून देणे. सध्या केवळ फोन कॉल करण्यासाठी मोबाईलचा वापर करणाऱ्या अनेक ग्राहकांना डेटासह येणारे प्लॅन घ्यावे लागतात. त्यामुळे प्रत्यक्ष गरज नसलेल्या डेटासाठीही पैसे मोजावे लागतात. नव्या नियमांमुळे अशा ग्राहकांना केवळ कॉलिंग आणि SMSसाठी स्वतंत्र प्लॅन निवडता येणार आहेत. याचा विशेष फायदा इंटरनेट किंवा मोबाइल डेटा फारसा वापरत नसलेल्या ग्राहकांना होऊ शकतो. ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण भागातील ग्राहक आणि कमी बजेटमध्ये मोबाईल सेवा वापरणाऱ्या ग्राहकांसाठी हे प्लॅन अधिक उपयुक्त ठरू शकतात.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २५६१/२०२६**

**सज्जाद मन्सुर आलम अन्सारी विरुध्द मुख्याधिकारी, न.प. बीड**

पहा, १. **सज्जाद मन्सुर आलम अन्सारी,** रा. मोमीनपुरा, बीड ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक सेफियान सज्जाद अन्सारी यांचा दिनांक १२/०८/२०११ रोजी** जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालवास- न.प. बीड ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्टरला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न.प. बीड. ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २१/१०/२०२६ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**तहसिलदार, बीड**

## 'कल्पतरु'च्या....

अक्षय मुंदडा, डॉ. योगेश क्षीरसागर, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, युवा नेते आदित्य सारडा, डॉ.ज्योती घुंबरे, जयश्री मुंडे, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे यांच्यासह परीक्षक समितीचे प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, क्षीरसागर कुटुंबीयांचा सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. मी स्वतः परळीत अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करत आले आहे; त्यामुळे अशा उपक्रमांतून स्थानिक पातळीवरील युवकांना व मंडळांना मिळणाऱ्या प्रेरणेचे महत्त्व मला ठाऊक आहे. बीडकरांनी या उपक्रमाला दिलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे, असे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. तर आभार प्रा.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी भाजपचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'कल्पतरु'कडून सातत्याने लोकोपयोगी उपक्रम : डॉ.योगेश क्षीरसागर– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिनाभरापूर्वी जाहीर केलेल्या या स्पर्धेत सहभागी ३० पैकी २१ गणेश मंडळांच्या उत्कृष्ट देखाव्यांना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. भविष्यातही ही स्पर्धा अविरत सुरू राहील, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. तसेच, आगामी काळात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना थेट दिलासा देणारे उपक्रम राबवले जातील, असेही ते म्हणाले. बीडच्या रेल्वे स्वप्नपूर्तीत स्व.गोपीनाथराव मुंडे आणि स्व.केशरकाकू क्षीरसागर यांचे मोठे योगदान असून, पंतप्रधान मोदी व पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळेच रेल्वे प्रत्यक्षात धावली, असे त्यांनी नमूद केले.

दोन मंडळांकडून पारितोषिकाची रक्कम दुष्काळग्रस्तांसाठी परत– पारितोषिक वितरण सोहळ्यात दोन गणेश मंडळांनी आदर्श सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावणाऱ्या दत्तात्रय गणेश मंडळाने २१ हजार रुपये, तर महाराणा प्रताप गणेश मंडळाने ३१ हजार रुपयांची बक्षीस रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 'कल्पतरु'कडे परत सुपूर्द केली. या दोन्ही मंडळांच्या संवेदनशीलतेचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

'या' गणेश मंडळांचा सन्मान; लाखोंची मिळाली पारितोषिके– बीडमध्ये आदियोगी देखावा साकारणाऱ्या न्यू गणेश मंडळाला १ लाख रुपये प्रथम पारितोषिक मिळाले. गंगावतरण देखावा साकारणाऱ्या नवरंग गणेश मंडळास द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, सीता स्वयंवर देखावा साकारणाऱ्या राष्ट्रीय गणेश मंडळ आस ५१ हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक मिळाले आहे. तसेच, उत्तेजनार्थ गणेश मंडळांमध्ये महाराणा प्रताप गणेश

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं २५५५/२०२६**

**सुभाष अंबादास चव्हाण –विरुध्द–ग्रा.पं. कार्यालय, आहेर लिंबगाव**

पहा, १. **सुभाष अंबादास चव्हाण,** रा. आहेर लिंबगाव ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक– **वर्षा सुभाष चव्हाण यांचा दिनांक २६/०७/२०११ जन्म** रोजी झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत – कार्यालय/न.प. कार्यालयास **आहेरलिंबगाव** ता.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **आहेर लिंबगाव** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यांनिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २१/१०/२०२६ ही आहे.**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**तहसिलदार, बीड**

शिक्का

◆ पान ४ वरून पुढे...

## जायकवाडी प्रकल्पातून...

सिंचन योजनेचे सर्वेक्षण खाजगी संस्थेद्वारे करण्यात आले असून मी स्वतः त्यासाठी २७. ०० लक्ष रुपये खर्च केले आहेत शिरूर कासार भाजपा मंडळाध्यक्ष सुरेश उगलमुगले,पाटोदा मंडळाध्यक्ष भागवत येवले व माऊली जरांगे हे या कामासाठी अनेक दिवस प्रयत्नशील होते. प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू असताना हे तिघे तर होतीच त्यांचं बरोबर माझे कार्यकर्ते देखील सर्वेक्षणादरम्यान उपस्थित राहून परिश्रम घेतले आहेत.या उपसासिंचन योजने चे सर्वेक्षण पूर्ण झाले असून लवकरच या कामास मंजुरी मिळणार असून आपण स्वतः ही मंजुरी मिळवण्यासाठी सक्षम आहोत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस याबाबत अत्यंत संवेदनशील असून त्यांनी वारंवार मराठवाड्यासाठी पाणी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले आहे हे सर्व माहीत असताना देखील भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांनी मोर्चाचे नाटक केले आहे या मोर्चाच्या बॅनर वर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांचे फोटो लावण्याचे काहीही कारण नाही त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा फोटो लावून त्यांच्याच विरोधात मोर्चा काढावा असे सांगत ते पुढे म्हणाले की, आष्टी विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती अस्तित्वात नव्हती भीमराव धोंडे हे महायुतीच्या उमेदवाराच्या विरोधात अपक्ष उमेदवार होते तर बाळासाहेब आजबे हे महायुतीचे असून देखील त्यांच्या पक्षाच्या तिकिटावर माझ्याविरुद्ध लढले आहेत दोघांचाही दारुण पराभव झाला आता कार्यकर्ते न उरल्यामुळे ते एकत्र आले आहेत म्हणजेच स्वार्थासाठी एकमेकांविरुद्ध लढले आणि मतलबासाठी एक झाले अशी मिश्कील टिपणी त्यांनी शेवटी केली

## पर्यावरणमंत्री पंकजाताई,...

वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. महसूल व पोलिस प्रशासनातील काही अधिकारी अथवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या वाहनांचा अवैध गौण खनिज उत्खनन किंवा वाहतुकीत सहभाग असल्याची चर्चा नागरिकांमध्ये असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, या आरोपांची अद्याप स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. डोंगर उत्खननामुळे जंगल, माती व भूजल धोक्यात– डोंगररांगांचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाल्यास जंगल, झाडे, जैवविविधता, मातीची धूप आणि भूजल पुनर्भरण प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. डोंगर उत्खननामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची नैसर्गिक प्रक्रिया बाधित होऊ शकते. परिणामी भविष्यात भूजलपातळी आणखी खालावण्याचा धोका असल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. बालाघाटाच्या डोंगररांगा या केवळ भौगोलिक रचना नसून त्या परिसरातील नैसर्गिक जलसंधारण, जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोलाचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे त्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## दुष्काळग्रस्त शेतकरी....

सक्तीने वसुली करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच सावकारी कर्जाचे वाटप करताना परवान्यातील अटी व शर्ती, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुका उपनिबंधक व सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनाही निर्देश देण्यात आले आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वैध परवानाधारक सावकारांना सदर सूचनांची माहिती देऊन त्याचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करावी. तसेच सूचनांच्या अनुपालनाबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागिरांना आर्थिक अडचणींच्या काळात दिलासा मिळावा आणि सावकारी कर्जाच्या सक्तीच्या वसुलीपासून त्यांना संरक्षण मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

## फुटबॉलच्या मैदानात....

६ ऑक्टोबर २०२६ रोजी जालना येथे होणार आहे.

१४ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, बीड यांच्याविरुद्ध झालेल्या चुरशीच्या सामन्यात शिव शारदा पब्लिक स्कूलने १–० असा विजय मिळवत विजेतेपदावर नाव कोरले. मुलींचा विभागीय सामना ९ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

तर १४ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल, परळी यांच्यावर शिव शारदा पब्लिक स्कूलने ४–० असा एकतर्फी विजय मिळवत विभागीय स्तरावर प्रवेश निश्चित केला. या संघाचा विभागीय सामना ८ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

एकाच जिल्हास्तरीय स्पर्धेत शाळेच्या तिन्ही फुटबॉल संघांनी विजेतेपद मिळवत विभागीय स्तरावर निवड होणे, ही शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी ठरली आहे. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक लन सर, वैभव काळे आणि सीमा मिस यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, आमदार विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स अकादमीचे संचालक रणवीर पंडित, युवा नेते पृथ्वीराज पंडित तसेच शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य डॉ. विशाल भारद्वाज यांनी तिन्ही संघांतील खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून विभागीय स्तरावरील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या. तिन्ही संघांच्या या दैदिप्यमान यशामुळे शिव शारदा पब्लिक स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

## अ‍ॅट्रॉसिटीची प्रलंबित....

विशेषतः ट्रॉसिटीची प्रकरणे फास्ट ट्रॅकवर घेऊन निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत,अशा सूचना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिल्या. सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने २६ सप्टेंबर २०२६ रोजी ट्रॉसिटी कायद्यांतर्गत न्यायालयात तसेच पोलीस विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा जिल्हाधिकारी श्री.पुजार यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर आढावा घेण्यात आला.या बैठकीत प्रलंबित प्रकरणांची सद्यस्थिती,ती निकाली काढण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि संबंधित यंत्रणांमध्ये आवश्यक असलेल्या समन्वयाबाबत चर्चा करण्यात आली.

ट्रॉसिटीसारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे एवढाच उद्देश न राहता पीडित व्यक्तीला वेळेत न्याय मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रकरण दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यास पीडित व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबाला न्यायाची प्रतीक्षा करावी लागते.त्यामुळे अशा प्रकरणांच्या निपटाऱ्यात येणाऱ्या अडचणी वेळीच ओळखून त्या दूर करण्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली.न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे कोणत्या कारणांमुळे निकाली निघू शकलेली नाहीत, त्यामध्ये नेमक्या कोणत्या अडचणी येत आहेत,तसेच त्या अडचणी दूर करण्यासाठी कोणत्या स्तरावर कार्यवाही करणे आवश्यक आहे, याचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.प्रलंबित प्रकरणांचा निपटारा अधिक गतीने होण्यासाठी पोलीस विभाग आणि सरकारी वकील यांच्यामध्ये प्रभावी समन्वय असणे आवश्यक असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## पिंपळनेर भागात...

सेल्सिअस आणि किमान तापमान २३ अंश सेल्सिअस इतके होते. मात्र, अवघ्या दोनच दिवसांत कमाल आणि किमान तापमान ३३ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत आहे. दोन्ही तापमानांत वाढ झाल्याने वातावरण अधिक उष्ण झाले आहे. मुळात हवेतील आर्द्रता ओलावा कमी झाल्याने उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे. सध्याच्या उष्णतेमुळे नागरिक घामाघूम होत आहेत. सप्टेंबरच्या सुरुवातीलाच जाणवणारा हा उष्मा म्हणजे ऑक्टोबर हिटची चाहूलच वाटत आहे. या वाढत्या उष्णतेमुळे शीतपेयांची मागणी वाढली आहे. मात्र, उष्णता वाढली असली तरी सर्दी-खो-कल्याच्या धास्तीमुळे कोल्ड्रिक्स पिण्यास फारसे कुणी धजावताना दिसत नाही. दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे साथीचे रोग पसरण्याची भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. पावसाने थोडीशी उघडीप घेताच वाढत्या तापमानाने डोके वर काढले आहे. सोमवार, मंगळवारीही नागरिकांना उन्हाचे चटके बसले. राज्यात अद्यापही काही ठिकाणी पाऊस पडत असला तरी अनेक भागांत त्याने विश्रांती घेतली आहे. त्यानंतर हवामानाने अचानक कूस बदलली असून, या बदलामुळे सप्टेंबरमध्येच नागरिकांना ऑक्टोबर हिटचा तडाखा बसू लागला आहे. एल निनोचा तीव्र प्रभाव असल्यामुळे वाता-वरणात उष्णता वाढली असून, सध्या तापमान ३३ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# लोकांना ओळखा: 'ब्रेडक्रंबिंग'



● आपल्या आयुष्यात आपण खूप लोकांना जागा देतो,बरेचदा आपण आपल्या गरजांसाठी अशा ठिकाणी थांबतो.लोकं ओळखताना सजग असणे गरजेचे आहे. या ठिकाणी मी आपल्याला एक प्रचलित गोष्टीचा संदर्भासहित उदाहरण देतो. एका माणसाने बिस्किटचे आमिष दाखवून कुत्र्याच्या एका लहान पिल्लाला आपल्या मागे लावले. ते पिल्लू पूर्ण आशेने आणि विश्वासाने त्याच्या घराबाहेर उपाशी-तहानलेले बसून राहिले.काही दिवसांनी तो माणूस बाहेर आला, उसने पुन्हा अर्धी भाकरी टाकली आणि तो निघून गेला. ते पिल्लू फक्त याच आशेवर टिकून राहिले की, कधीतरी त्याला पूर्ण प्रेम आणि पोटभर अन्न मिळेल.मानसशास्त्रात (Psychology) याला 'ब्रेडक्रंबिंग' (Breadcrumbing) म्हणतात.

● काही लोक तुम्हाला कधीच पूर्ण प्रेम,आपुलकी किंवा मानसन्मान देत नाहीत. ते फक्त मध्येमध्ये थोडीशी आशा (आमिष) दाखवून तुम्हाला स्वतःशी बांधून ठेवतात कधी स्वतःच्या अहंकाराच्या समाधानासाठी, तर कधी तुम्हाला एक 'बैकअप पर्याय' (Backup Option) म्हणून ठेवण्यासाठी. बरेचदाएखाद्या नात्यात अडकलेले असल्यामुळे, तर काही वेळा फक्त तुमचा वापर करून घेण्यासाठी किंवा करमणूक म्हणून तुमच्या भावनांशी खेळले जाते.अशा माणसासाठी मनापासून खोल भावना ठेवणे किंवा स्वतःचा वेळ आणि ऊर्जा खर्च करणे ही निव्वळ मूर्खता आहे.आपला आत्मसन्मान नेहमी जपा. अशा लोकांना आयुष्यातून तात्काळ बाजूला करा.ही गोष्ट जरी कुत्र्याच्या पिल्लावर लिहिलेली असली, तरी हेच मानवी आयुष्याचे कटू सत्य आहे.

● पुढील काही मुद्यांमधून आपण ते अजून सविस्तर जाणून घेऊया:-

● 'ब्रेड क्रंबिंग' आणि आत्मसन्मान : भावनिक भुकेचा गैरफायदा: ज्याप्रमाणे उपाशी पिल्लाला अन्नाचा एक तुकडाही खूप मोठा वाटतो, तसेच भावनिकदृष्ट्या एकटे पडलेले लोक प्रेमाच्या छोट्याशा तुकड्यावरही जगू लागतात.

●'ब्रेड क्रंबिंग'चे मूळ स्वरूप: हे असे एक मानसिक जाळे आहे, जिथे समोरची व्यक्ती तुम्हाला कधीच पूर्ण स्वीकारत नाही आणि पूर्णपणे सोडूनही जात नाही.

● आशा आणि भ्रम यातील फरक: लोक बदलतील, ते आधीसारखे प्रेम देतील, हा फक्त तुमचा भ्रम असतो; वास्तव हेच असते की ते फक्त त्यांचा स्वार्थ साधत असतात.

● कमीतकमी प्रयत्नात जास्तीत जास्त फायदा: अशा लोकांना तुमच्याकडून सर्व काही हवे असते, पण स्वतः मात्र तुम्हाला काहीही देण्याची त्यांची तयारी नसते.

● तुम्ही फक्त एक पर्याय आहात: जेव्हा त्यांच्याकडे इतर कोणीही नसते, तेव्हा त्यांना तुमची आठवण येते. तुम्ही त्यांच्या प्राधान्यक्रमात (Priority) कधीच नसता.

● भावनिक खेळ (Emotional Control): तुम्ही दूर जाऊ लागलात की ते पुन्हा थोडेसे प्रेम दाखवतील, आणि तुम्ही जवळ आलात की पुन्हा दुर्लक्ष करतील.

● आत्मविश्वासाचा अंत: सतत दुर्लक्षित राहिल्यामुळे हळूहळू माणसाला स्वतःच्याच योग्यतेबद्दल शंका येऊ लागते.

● नात्यातील असमानता: ज्या नात्यात एका बाजूने १००% गुंतवणूक असते आणि दुसऱ्या बाजूने फक्त शून्य किंवा नावालाच प्रतिसाद असतो, ते नाते नसून एक प्रकारचे शोषण आहे.

● वेळेची आणि ऊर्जेची हानी: चुकीच्या माणसावर उधळलेली तुमची काळजी, प्रेम आणि वेळ कधीही परत येत नाही. न मिळालेल्या उत्तरांचे ओझे: "माझं काय चुकलं?" हा प्रश्न स्वतःला विचारणे बंद करा. चूक तुमची नाही, तर समोरच्या व्यक्तीच्या नियतीची आहे.

● आत्मसन्मानाची जाणीव (Self-Respect): भिकारी बनून मागितलेले प्रेम कधीच आनंद देऊ शकत नाही. स्वाभिमानाने जगणे हे नात्यांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.

● सीमारेषेचे महत्त्व (Setting Boundaries): तुमच्या आयुष्यात कोणाला किती प्रवेश द्यायचा, याचे नियम तुम्ही स्वतः ठरवले पाहिजेत.

●'नाही' म्हणायला शिका: कोणाच्या अर्ध्याकच्च्या प्रेमाचा स्वीकार करण्यापेक्षा एकटे राहणे कधीही उत्तम आणि सन्मानजनक असते.

● भावनिक स्वावलंबन: स्वतःच्या आनंदासाठी आणि समाधानासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहणे थांबवा. स्वतःचे सर्वोत्तम मित्र बना.

● नात्यांचा दर्जा ओळखा: ज्या नात्यात तुम्हाला सतत तुमचे अस्तित्व सिद्ध करावे लागते, ते नाते टिकवून ठेवण्यात काहीच अर्थ नाही.

● विषारी संबंधांमधून बाहेर पडा (Toxic Relationships): गुंफलेल्या जुन्या आठवणींना पकडून ठेवण्यापेक्षा भविष्यातील चांगल्या माणसांसाठी जागा रिकामी करा.

● इशारे ओळखा (Red Flags): सतत भेटण्याचे किंवा बोलण्याचे टाळाटाळ करणे आणि फक्त स्वतःच्या गरजेनुसार समोर येणे, हे धोक्याचे संकेत आहेत.

● मौन हेच उत्तर: अशा लोकांशी वाद घालण्यात आपली ऊर्जा वाया घालवू नका; शांतपणे त्यांच्या आयुष्यातून निघून जाणे हाच सर्वात मोठा धडा आहे.स्वतःवर प्रेम करा (Self-Love): तुम्ही ज्या प्रेमाची अपेक्षा दुसऱ्यांकडून करत आहात, ते आधी स्वतःला द्यायला शिका.

● तुमचे मूल्य ओळखा: तुम्ही कोणाची 'दुसरी पसंती' किंवा 'बैकअप पर्याय' बनण्यासाठी जन्माला आलेला नाहीत.

● भूतकाळातील चुकांमधून शिका: अशा अनुभवांना आयुष्याचा वाईट टप्पा मानण्यापेक्षा एक महत्त्वाचा धडा म्हणून स्वीकारा.

● मानसिक शांततेला प्राधान्य द्या: सततच्या मानसिक त्रासापेक्षा एकांतातील शांतता हजार पटीने श्रेष्ठ असते.।

● चुकीच्या आशेला पूर्णविराम: "कधीतरी सगळे ठीक होईल" या आशेपोटी स्वतःचे वर्तमान नष्ट करू नका.

● लोकांचे शब्द नाही, कृती पहा: गोड बोलणारे सगळेच आपले नसतात; कठीण काळात कोण सोबत उभे राहते, यावरून माणसाची ओळख होते.

● अपेक्षांचे ओझे कमी करा: समोरच्याकडून नसलेल्या गोष्टींची अपेक्षा ठेवणे म्हणजेच स्वतःहून दुःखाला आमंत्रण देणे होय.

● स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करा: तुमची ऊर्जा, वेळ आणि विचार अशा ठिकाणी लावा जिथे तुमचे भविष्य उज्ज्वल होईल.

● सच्च्या नात्यांची किंमत करा: जे लोक खरोखर तुमची काळजी घेतात, त्यांच्यासाठी वेळ द्या; चुकीच्या माणसांच्या मागे धावणे थांबवा.

● भावनिक परिपक्वता (Emotional Maturity): प्रत्येक माणसाला बदलण्याचा प्रयत्न करू नका; काही लोकांना जसे आहेत तसेच सोडून पुढे जाणे शिकले पाहिजे.

● स्वतःची जागा निर्माण करा: तुमचे आयुष्य इतके समृद्ध बनवा की कोणाच्या येण्याने किंवा जाण्याने तुमचे संतुलन बिघडणार नाही.

● सकारात्मक दृष्टिकोन: एका वाईट नात्यामुळे पूर्ण आयुष्य वाईट होत नाही, हे नेहमी लक्षात ठेवा.

● अहंकार आणि आत्मसन्मानातील फरक: स्वतःच्या आदरासाठी घेतलेला निर्णय हा अहंकार नसून तो आत्मसन्मान असतो. हक्क सांगायला शिका: जर तुम्ही नात्यात संपूर्ण समर्पण देत असाल, तर समोरूनही सन्मान मिळण्याचा तुम्हाला पूर्ण हक्क आहे.

● मनाची कवाडे उघडी ठेवा: एका चुकीच्या माणसाच्या अनुभवामुळे सर्वच माणसांबद्दल वाईट ग्रह करून घेऊ नका.

● स्वतःला दोष देणे थांबवा: समोरच्या व्यक्तीची नीती आणि वागणूक यासाठी तुम्ही जबाबदार नाही.

● शांत आणि ठाम निर्णय: अशा लोकांपासून दूर होताना कोणताही राग किंवा द्वेष न ठेवता शांतपणे संबंध तोडा.

● व्यक्तिमत्त्वाचा विकास: तुमचे विचार आणि तुमचे वर्तन इतके मजबूत करा की कोणीही तुमच्या भावनांशी सहज खेळू शकणार नाही.

● वास्तव स्वीकारणे: कडू असले तरी सत्य स्वीकारण्याची ताकद ठेवा; बदलाची खोटी आशा बाळगू नका.

● स्वातंत्र्याचा अनुभव: विषारी नात्यांमधून बाहेर पडल्यानंतरच माणसाला खऱ्या भावनिक स्वातंत्र्याचा अनुभव होतो.

● स्वतःचे मार्गदर्शक बना: तुमच्या आयुष्याची सूत्रे दुसऱ्याच्या हातात न देता स्वतःच्या हातात ठेवा.

● अंतिम सत्य: जो माणूस तुमची कदर करत नाही, त्याला गमावणे हा तुमचा तोटा नसून,तो तुमचा सर्वात मोठा विजय आहे. आयुष्यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला एक धडा शिकवण्यासाठी येत असते. कोणी प्रेम देऊन आयुष्य समृद्ध करतं, तर कोणी अपेक्षाभंग करून आपल्याला खंबीर बनवतं. 'ब्रेड क्रंबिंग'सारख्या मानसिकतेत अडकण्यापेक्षा ही गोष्ट वेळेत ओळखणे आणि स्वाभिमानाने पाऊल पुढे टाकणे यातच बुद्धिमत्ता आहे. स्वतःच्या भावनांचे मोल ओळखा आणि ज्या नात्यात सन्मान नाही, तिथे थांबणे बंद करा. लक्षात घेण्यासारख्या बाबी-"भिकेमध्ये मिळालेल्या प्रेमापेक्षा स्वाभिमानाने जपलेला एकांत हजार पटीने श्रेष्ठ असतो. स्वतःचे मोल ओळखा, कारण तुमचे अस्तित्व हे कोणाचा 'पर्याय' होण्यासाठी नाही, तर स्वतःमध्ये संपूर्ण असण्यासाठी आहे! "धन्यवाद .

-लेखक: **श्री. सुभाष रामचंद्र राठोड**
(प्राथमिक शिक्षक)
मु.पो. सावळी तांडा,
ता. मुखेड, जि. नांदेड

# रात्री पायात तीव्र कळ; स्नायू आखडतात अन् झोप उडते! जाणून घ्या शरीरातील पाण्याची कमतरता की गंभीर आजार?

रात्री गाढ झोपेत असताना अचानक पायाच्या स्नायूंमध्ये तीव्र कळ येऊन झोप उडणे, ज्याला सामान्य भाषेत 'पायात गोळा येणे' म्हटले जाते, हा अनुभव अनेक जण घेतात. काही वेळेस पायाचा मागचा भाग इतका आखडतो की काही सेकंद किंवा मिनिटे पाय हलवणेदेखील कठीण होऊन बसते. ही वेदना काही काळापुरती असली तरी त्या क्षणी होणारी अस्वस्थता अत्यंत त्रासदायक असते. अनेक जण या समस्येला सामान्य मानून दुर्लक्ष करतात. पण, जर हा त्रास वारंवार होत असेल, तर त्यामागे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, मज्जासंस्थेवर ताण किंवा काही औषधांचे दुष्परिणाम यांसारखी महत्त्वाची कारणे असू शकतात.

## ● रात्री पायात कळ येणे म्हणजे नेमके काय?

वैद्यकीय भाषेत याला 'नॉक्टर्नल लेग क्रॅम्प्स' म्हणतात. यामध्ये पायांच्या स्नायूंमध्ये अचानक आणि अनैच्छिक आकुंचन होते. स्नायू अत्यंत कडक होतात आणि तीव्र वेदना सुरू होतात. ही कळ काही सेकंदांपासून ते काही मिनिटांपर्यंत राहू शकते. कळ निघून गेल्यानंतरही संबंधित स्नायूमध्ये काही तासांपर्यंत मंद वेदना किंवा संवेदनशीलता जाणवू शकते.

## ● पायात गोळा येण्याची मुख्य ६ कारणे

शरीरात पाण्याची कमतरता: दिवसभरात पुरेसे पाणी न पिण्यामुळे स्नायूंमधील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन बिघडते, ज्यामुळे रात्री क्रॅम्प्स येतात. औषधांचे दुष्परिणाम: उच्च रक्तदाबासाठी वापरली जाणारी औषधे किंवा कोलेस्ट्रॉल कमी करणारी 'स्टॅटिन' प्रकारची औषधे घेणाऱ्यांना हा त्रास होऊ शकतो. अति मद्यपान आणि यकृताचे आजार: मद्यपानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण घटते आणि यकृताच्या कार्यात अडथळा आल्याने स्नायूंवर परिणाम होतो. स्नायूंवर अतिरिक्त ताण: दिवसभर जास्त वेळ उभे राहणे, कडक उन्हात काम करणे किंवा अचानक जास्त व्यायाम केल्याने स्नायूंवर ताण येतो. पोषक घटकांची कमतरता: शरीरात कॅल्शियम, मॅग्नेशियम किंवा पोटॅशियम या खनिजांची कमतरता असल्यास मज्जासंस्थेचे संदेश स्नायूपर्यंत व्यवस्थित पोहोचत नाहीत. वाढते वय आणि गर्भावस्था: वय वाढल्यानंतर स्नायू कमकुवत होतात. तसेच गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यात शरीराचा भार वाढल्याने महिलांना हा त्रास अधिक होतो.



## ● झोपेत अचानक पायात कळ आल्यास काय कराल?

सरळ उभे राहा: बिछान्यातून उठून सावकाशपणे जमिनीवर पाय ठेवून सरळ उभे राहण्याचा प्रयत्न करा. पायावर शरीराचा हलका भार पडल्यास क्रॅम्प लवकर कमी होतो.

हळुवार स्ट्रेचिंग करा: पायाची बोटे वरच्या दिशेने (घोट्याकडे) ओढा, ज्यामुळे मागचे स्नायू स्ट्रेच होऊन आराम मिळेल.

झोपण्यापूर्वी हलके व्यायाम: वारंवार हा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी ५ मिनिटे पायाचे हलके स्ट्रेचिंग करा.

## ● डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

एखाद्या वेळी पायात गोळा येणे सामान्य असू शकते. पण, हा त्रास आठवड्यातून अनेकदा होत असेल, वेदना असह्य असतील किंवा पायावर सूज येत असेल तर वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. स्वतःच्या मनाने कोणतीही पेनकिलर्स, इलेक्ट्रोलाइट्स किंवा सप्लिमेंट्स सुरू न करता डॉक्टरांच्या सल्ल्याने मूळ कारणावर उपचार करणे योग्य ठरते.

# फणसाची निहारी कधी खाल्ली आहे? एकदा नक्की ट्राय करा ही हटके रेसिपी



● निहारी म्हटलं की साधारणपणे चिकन किंवा मटणाची आठवण होते. मात्र, फणसाचा वापर करून याची शाकाहारी आवृत्तीही तयार करता येते. मसालेदार आणि भरपूर फ्लेवर असलेली ही भाजी बनवण्यासाठी थोडा वेळ लागतो, पण त्याची चव नक्कीच वेगळी आहे. अगदी सोप्या पद्धतीने तयार होणारी ही रेसिपी घरात सर्वांना आवडेल.

● ही निहारी बनवण्यासाठी सर्वप्रथम फणसाचे साल काढून त्याचे मध्यम आकाराचे तुकडे करून घ्या. गरम पाण्यात मीठ आणि हळद घालून फणसाचे तुकडे दोन-तीन मिनिटे उकळून घ्या. फणस उकळलेले पाणी फेकून न देता बाजूला ठेवा, कारण पुढे ग्रेव्ही तयार करताना त्याचा वापर करता येईल. त्यानंतर धणे, जिरे, शाही जिरे, काळी मिरी, दालचिनी, वेलची, लवंग, बडीशेप, जायफळ, जावित्री आणि इतर खडे मसाले बारीक करून निहारी मसाला तयार करा. आता ग्रेव्हीला खास चव आणि घट्टपणा देण्यासाठी उकडलेले चणे आणि मशरूम थोड्या चण्याच्या स्टॉकसोबत बारीक वाटून घ्या. कढईत मोहरीचे तेल गरम करून त्यात फणसाचे उकडलेले तुकडे हलके परतून घ्या आणि ते बाजूला काढा. त्याच कढईत चिरलेला कांदा सोनेरी रंगाचा होईपर्यंत परता. त्यानंतर आले-लसूण पेस्ट, हिरवी मिरची, तयार मसाला, चणा-मशरूमची पेस्ट, हळद आणि लाल तिखट घालून सर्व मिश्रण व्यवस्थित शिजवून घ्या. यानंतर फणस उकळण्यासाठी वापरलेले पाणी आणि चण्याचा स्टॉक ग्रेव्हीमध्ये घाला.

● तयार केलेला निहारी मसाला आणि परतलेले फणसाचे तुकडे त्यात मिसळा. कढईवर झाकण ठेवून ही भाजी मंद आचेवर साधारण दहा ते पंधरा मिनिटे शिजू द्या. यामुळे फणसामध्ये मसाल्यांची चव चांगली मुरते आणि ग्रेव्हीलाही छान स्वाद येतो. ग्रेव्ही तयार झाल्यानंतर ती गाळून घेऊन पुन्हा कढईत घाला. दुसऱ्या कढईत थोडं तूप गरम करून त्यात बेसन आणि गव्हाचे पीठ हलके भाजून घ्या. त्यात गाळलेली ग्रेव्ही घालून नीट मिसळा आणि त्यानंतर फणसाचे तुकडे पुन्हा ग्रेव्हीमध्ये टाका. शेवटी थोडे केवड्याचे पाणी, आल्याचे काप, हिरवी मिरची, कोथिंबीर, पुदिना आणि निहारी मसाला घालून आणखी एक मिनिट शिजवा. बस्स, आता तुमची मसालेदार फणसाची निहारी तयार आहे. वरून आल्याचे काप, हिरवी मिरची आणि कोथिंबीर घालून ही गरमागरम सर्व्ह करा. रोटी, नान, पराठा किंवा भातासोबत या निहारीचा आस्वाद घेता येईल.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं:-२७१८/२०२६**

**हिना मुख्तार शेख विरुद्ध ग्रा.पं. कार्यालय, पिंपळनेर**

पहा

१. **हिना मुख्तार शेख,** रा. पिंपळनेर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक हिना मुख्तार शेख यांचा दिनांक ०७/०७/१९९३ रोजी जन्म** झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु: अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पिंपळनेर** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **पिंपळनेर** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररता घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ /०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यांनिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १०/१० /२०२६ ही आहे.**

**(स्वाक्षरीत)**

शिक्का **तहसीलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं:-२७१९/२०२६**

**ताजोद्दीन आजमोद्दीन शेख विरुद्ध ग्रा.पं. कार्यालय, पिंपळनेर**

पहा

१. **ताजोद्दीन आजमोद्दीन शेख,** रा. पिंपळनेर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक तहुरा ताजोद्दीन शेख यांचा दिनांक २७/०३/२०१७ रोजी जन्म** झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु: अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पिंपळनेर** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **पिंपळनेर** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररता घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यांनिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १०/१० /२०२६ ही आहे.**

**(स्वाक्षरीत)**

शिक्का **तहसीलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं:-२७२०/२०२६**

**विलास रामा आगलावे विरुद्ध ग्रा.पं. कार्यालय, पिंपळनेर**

पहा

१. **विलास रामा आगलावे ,** रा. पिंपळनेर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक वैष्णवी विलास आगलावे यांचा दिनांक ३०/०९/२०११ रोजी जन्म** झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु: अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पिंपळनेर** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **पिंपळनेर** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररता घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यांनिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १०/१० /२०२६ ही आहे.**

**(स्वाक्षरीत)**

शिक्का **तहसीलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं:-२७२१/२०२६**

**सलीम अय्युब शेख विरुद्ध ग्रा.पं. कार्यालय, पिंपळनेर**

पहा

१. **सलीम अय्युब शेख,** रा. पिंपळनेर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक सलीम अय्युब शेख यांचा दिनांक ३१/१२/१९९० रोजी जन्म** झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु: अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पिंपळनेर** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **पिंपळनेर** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररता घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ /०९/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यांनिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १०/१० /२०२६ ही आहे.**

**(स्वाक्षरीत)**

शिक्का **तहसीलदार, बीड**

## थोडक्यात...


### इमामपूरमध्ये गणेश अनंत चतुर्थी निमित्त कीर्तन महोत्सव संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त इमामपूर, येथे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मवीर प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य कीर्तन सोहळा शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या धार्मिक कार्यक्रमाला भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमात ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकटस्वामी महाराज संस्था, नेकनूर) यांनी कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थित भाविकांना आध्यात्मिक व सामाजिक संदेश दिला. गणेशभक्ती, संतविचार आणि अध्यात्माच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. कीर्तन सोहळ्यादरम्यान भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या उत्साहाने कीर्तनाचा लाभ घेतला. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत कार्यक्रमाची सांगता केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक उपक्रमातून भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धर्मवीर प्रतिष्ठानच्या पदाधिकारी, युवा सैनिक शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### कुसाराम गाडेकर यांचे निधन पत्रकार बापू गाडेकर यांना पितृशोक



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील रहिवासी असलेले ज्येष्ठ नागरिक कुशाराम ठमाजी गाडेकर (वय ७५ वर्षे) यांचे रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी पहाटे दुर्दैवी निधन झाले आहे. पहाटे लघुशंकेसाठी ते घराबाहेर गेले असता घराशेजारील पैठणच्या उजव्या कालव्यात पाय घसरून पडल्याने हि दुर्घटना घडली. कालव्यात पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच त्यांचे वय अधिक असल्यामुळे त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ४:३० वाजता तलवाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ, तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय पदाधिकारी तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुशाराम गाडेकर हे महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार बापू गाडेकर यांचे वडील होत. त्यांच्या निधनाने गाडेकर परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे-पतवंडे असा मोठा परिवार आहे.

### वनश्री कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

येथील विभागीय वन अधिकारी कार्यालय परिसरात वनश्री कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, बीड यांची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर रोजी अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साही वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ साहेब हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल सागुळे साहेब, संस्थेचे अध्यक्ष डी. एस. ढास आणि संस्थेचे सचिव आर. पी. यादव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सभेच्या सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर संस्थेच्या वार्षिक कामकाजाचा आढावा, आर्थिक ताळेबंद तसेच सभासदांच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी बोलताना मान्यवरांनी, संस्थेने कर्मचारी आणि सभासदांच्या हितासाठी नेहमीच पारदर्शक व विश्वासार्ह काम केले असून भविष्यातही पतसंस्थेची प्रगती अशीच कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.या महत्त्वपूर्ण सभेस पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ, वन विभागातील अधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे कामकाज सुरळीत पार पाडल्याबद्दल शेवटी आर . पी.यादव उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

### वलभीमच्या भौतिकशास्त्र विभागाची अभ्यास भेट

**बीड । प्रतिनिधी**

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुनील बोबडे यांच्या मेडीकेअर सुपरस्पेशालिटी अँन्ड क्रीटीकल केअर हॉस्पिटल' येथे अभ्यास भेटी चे आयोजन करण्यात आले होते. अभ्यास भेटी दरम्यान हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे आणि किडनी रोग तज्ज्ञ डॉ. अजित घोडके यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या मेडिकल उपकरणांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.


# जायकवाडी प्रकल्पातून पाटोदा-शिरूरला ३.५७ टीएमसी पाणी

**उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण पूर्ण**

**धोंडे आणि आजबे स्वार्थासाठी एकमेका विरुद्ध लढले आणि मतलबासाठी एक झाले : आ.सुरेश धस यांचा घणाघात**

**आष्टी । प्रतिनिधी**

आमचे राजकीय विरोधक भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे हे विधानसभा निवडणूक स्वार्थासाठी एकमेकांच्या विरोधात लढले मात्र कार्यकर्ते न उरल्यामुळे स्वार्थासाठी ते आता एकत्र आले आहेत शासनाच्या विरोधात विरोधी पक्षाने मोर्चा काढण्या ऐवजी या दोघांनी मोर्चा



काढून स्वतःचे हसे करून घेतले आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. पत्रकारांशी अनौपचारिक बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

माजी आमदार भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांच्या आक्रोश मोर्चा बाबत पुढे बोलताना ते म्हणाले की दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे खुंटेफळ साठवण तलाव या ठिकाणी आले असता त्यांना आपण पाटोदा आणि शिरूर तालुक्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून ३.५७ टीएमसी पाणी आणण्यासाठी पाटोदा शिरूर कासार उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश द्यावेत अशी जाहीर मागणी केली होती आणि त्यापूर्वीच या विषयाचे दि.७ जानेवारी २०२५ रोजी आपण पत्र दिल्यानंतर शासनाने दि.२८ जानेवारी २० २५ रोजी जा.क्र. विकाक-/प्र.क्र.३४/लपा या पत्रान्वये पाटोदा, शिरूर (कासार) आणि आष्टी तालुक्यातील काही गावातील सतत दुष्काळी छायेतील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध होण्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून उपसा सिंचन योजनेसाठी सर्वेक्षण करणेबाबत मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले असून याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे आदेश कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांना देण्यात आले असून या पाटोदा शिरूर उपसा ▶▶ उर्वरित पान २ वरं



# पर्यावरणमंत्री पंकजाताई, यांच्या बीड जिल्ह्यातच डोंगररांगा उद्ध्वस्त; पर्यावरणाचा ऱ्हास!

**पर्यावरणप्रेमींचे साकडे ; गौण खनिजाच्या अवैध उत्खननामुळे बालाघाटाच्या डोंगररांगांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर: डॉ. गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यात डोंगररांगा, पठारे आणि टेकड्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र, भौतिक विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात मुरूम, दगड, गोटे व माती या गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याने बीड जिल्ह्यातील निसर्गरम्य बालाघाटाच्या डोंगररांगांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या जिल्ह्यातच डोंगररांगांची अशाप्रकारे होत असलेली हानी चिंताजनक असल्याची भूमिका पर्यावरणप्रेमींनी मांडली आहे. रस्ते, औद्योगिक वसाहती, बांधकामे तसेच विविध ग्रामविकास कामांसाठी गौण खनिजांची मागणी वाढत आहे. या मागणीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी अवैध उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींनी केला आहे. डोंगररांगांमध्ये मोठ्या प्रमाणावर फोडकाम होत असल्याने नैसर्गिक भूरचना, जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

तक्रारीनंतरही कारवाई होत नसल्याचा आरोप- अवैध गौण खनिज उत्खननाबाबत सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे ▶ उर्वरित पान २

# दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजुरांकडून सावकारी कर्जाची सक्तीने वसुली करू नये: जिल्ह्यातील सर्व परवानाधारक सावकारांना निर्देश

**अनुपालनाचा अहवाल सादर करण्याच्या तालुका उपनिबंधक व सहायक निबंधकांना सूचना**

**नांदेड । प्रतिनिधी**

पर्जन्यमानातील तूट व अन्य घटकांमुळे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झाल्यामुळे संदर्भीय शासन निर्णयानुसार या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने शासनामार्फत विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांनी आज, दि. २७ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात पाहणी केली. या पाहणीदरम्यान दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजुरांकडून सावकारी कर्जाची सक्तीने वसुली केली जात असल्याची बाब निदर्शनास आली. दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत शेतकरी आत्महत्यांसारख्या दुर्दैवी घटना घडू नयेत, यासाठी जिल्ह्यातील वैध परवानाधारक सावकारांनी सावकारी कर्जाची सक्तीने वसुली करू नये, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी आज तातडीने परिपत्रक काढून जिल्ह्यातील सर्व परवानाधारक सावकारांना सूचना दिल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर तसेच ग्रामीण कारागीर यांच्याकडून सावकारी कर्जाची ▶▶ उर्वरित पान २ वरं

# फुटबॉलच्या मैदानात शिव शारदा पब्लिक स्कूलची ऐतिहासिक भरारी!

**तिन्ही संघ विजयी ; विभागीय स्तरावर दिमाखदार प्रवेश**



**गेवराई । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. सरस्वती पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत शिवाजीनगर (गढी), ता. गेवराई येथील सीबीएसई माध्यमाच्या शिव शारदा पब्लिक स्कूलने फुटबॉलमध्ये ऐतिहासिक कामगिरी नोंदवत तीन संघांना विभागीय स्तरावर पोहोचवले आहे. १७ वर्षांखालील मुलांचा संघ, १४ वर्षांखालील मुलींचा संघ आणि १४ वर्षांखालील मुलांचा संघ अशा तिन्ही संघांनी विजेतेपद पटकावत विभागीय स्तरावर दिमाखदार प्रवेश केला.

१७ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात महाराणी ताराबाई पब्लिक स्कूल, वडवणी यांच्याविरुद्ध शिव शारदा पब्लिक स्कूलने ३-२ असा अटीतटीचा विजय मिळवत विजेतेपद पटकावले. या संघाचा विभागीय सामना ▶▶ उर्वरित पान २ वरं

# ॲट्रॉसिटीची प्रलंबित प्रकरणे फास्ट ट्रॅकवर निकाली काढा : जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

**● सेवा संकल्प अभियानातर्गत प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा**

**धाराशिव । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) न्यायालयात तसेच



पोलीस विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा गतीने निपटारा होऊन पीडितांना वेळेत न्याय मिळणे आवश्यक आहे. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढताना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन पोलीस विभाग आणि सरकारी वकील यांनी परस्पर समन्वयातून त्या दूर कराव्यात. ▶ उर्वरित पान २ वरं

### पिंपळनेर भागात सप्टेंबरमध्येच जाणवू लागल्या ऑक्टोबर हिट च्या झळा

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

जून महिन्यात मुसळधार बरसलेला पाऊस जुलै महिन्याच्या प्रारंभीच गायब झाल्याने वातावरणात एकदम उष्मा निर्माण झाला आहे. गेल्या चार-पाच दिवसांत बीड तालुक्यात किमान तापमानात पाच ते सहा अंश सेल्सिअसने वाढ झाली असून, सप्टेंबरमध्येच ऑक्टोबर हिटसारखा फील येत आहे. उन्हाचे चटके बसत आहेत. गेल्या महिन्यात पावसाची संततधार कायम असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता. परिणामी कमाल आणि किमान तापमानात घट झाली होती. मात्र, सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच दिवसापासून पाऊस गायब झाल्याने तालुक्यात प्रचंड उष्मा वाढला असून उन्हाचा जोरदार तडाखा बसत आहे. आठ दिवसांपूर्वी कमाल तापमान जवळपास २५ अंश ▶▶ उर्वरित पान २ वरं

# ग्राहक पंचायत बीड जिल्हा बैठक संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

ग्राहक पंचायत महाराष्ट्र, बीड जिल्ह्याची जिल्हास्तरीय बैठक विभागीय सहसंघटक सौ. शैलजा शेलमोकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी तीर्थरूप बिंदू माधव जोशी (नाना) यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट कार्याबद्दल प्रा. आर. जी. गर्जे सर यांचा जिल्हा उपाध्यक्षांच्या हस्ते हार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विभागीय सहसंघटक सौ. शैलजा शेलमोकर यांचाही उत्कृष्ट कार्यकर्ता सन्मान पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णू देशमुख यांनी केले. मावळ येथे झालेल्या ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या अधिवेशनातील कार्याची माहिती व मार्गदर्शन सौ. शैलजा शेलमोकर यांनी केले. शाळांमध्ये विद्यार्थी ग्राहक जागृती अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्याची गरज असून, त्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे त्यांनी सांगितले. यानंतर प्रा. आर. जी.



गर्जे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या कार्याबाबत मार्गदर्शन केले. वयाची मर्यादा असली तरी ग्राहक पंचायतचे कार्य सोडण्याची इच्छा नाही. यापुढेही वेळोवेळी मार्गदर्शन करत राहणार असल्याचे त्यांनी मनोगतातून व्यक्त केले. यावेळी जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संघटनेची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने दैनंदिन जीवनातील काही वेळ सामाजिक कार्यासाठी देणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्यात ग्राहक पंचायतचे कार्य अधिक मजबूत करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असून, त्याशिवाय व्यापक ग्राहक जागृती होणे शक्य नाही. यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले. बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यापुढे संघटनेची जिल्हास्तरीय बैठक दर दोन महिन्यांनी घेण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले. बैठकीस विभागीय सहसंघटक सौ. शैलजा शेलमोककर, जिल्हाध्यक्ष प्रा. आर. टी. गर्जे सर, जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे, शंकर झाडे (वडवणी), प्रवीण कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, विष्णू देशमुख, अंगद सागळे (पाटोदा), सुधाकर माळवदे यांच्यासह जिल्ह्यातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.